करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




Shweta
Gift & Toys
श्वेता गिफ्ट अँन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप)
4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106)


रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१७ | पाने-१२ | दि.१४/०२/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.


हॉटेल राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
फ्रेज
• शुध्द शाकाहारी
• चायनीज

लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा, नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी सर्व सुविधा उपलब्ध..!
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444)


# जातेगाव ते टेंभूर्णी रस्त्याच्या कामासाठी प्रशासन सज्ज

## भुसंपादनाबाबत शेतकरी नाराज

करमाळा : अहमदनगर-करमाळा - टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्ग क्र.५६१ ए या रस्त्यावरील जातेगाव ते टेंभूर्णी असे ५९.१ किलोमीटर अंतराचे चार पदरी रस्त्याचे काम करण्यास प्रशासन सज्ञ आहे. याबाबत राजपत्र भाग क्र.२, खंड क्र.३, उपखंड क्र.२ हे करमाळा शहर व जेऊर येथील संपादीत जमिनीचे राजपत्र २८ जानेवारी २०२५ ला प्रसिध्द झाले आहेत. याच रस्त्यावरील संपादनास करमाळा तालुक्यातील मांगी व माढा तालुक्यातील अकोले खुर्द येथील शेतकऱ्यांचा विरोध आहे. याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी नुकतीच (१२ फेब्रुवारी) सोलापूरला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक बोलावली होती. त्यावेळी भुसंपादन होत असलेल्या शेतकऱ्यांना निमंत्रित केले होते. जिल्हाधिकारी यांनी यावेळी संबंधित शेतकऱ्यांना मोजणी होवू द्या, तुम्ही विरोध केल्यास तुमच्यावर शासकीय कामकाजात अडथळा केल्याचा



गुन्हा दाखल होईल; असा सज्जड दम दिला आहे. असे असलेतरी शेतकरी मात्र कणखर भुमिकेत असून शासन हे आडमुठ्या धोरणाने वागत असल्याने आमचा त्यास विरोध आहे; असे शेतकऱ्यांनी ठाम सांगितले आहे. (पान नं.२ वर...)

शासनाचा पूर्वीचा अवघा ७ मीटर रूंदीचा डांबरी रस्ता असताना सध्या शासन मात्र २४ मीटर रस्ता असल्याचे सांगत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या १७ मीटर रूंदीचे क्षेत्र शासन फुकट लाटण्याच्या प्रयत्नात आहे. याशिवाय जातेगावच्या पलिकडे अहमदनगर(अहिल्यानगर) पर्यंत ४५ मीटर ते ६० मीटर एवढ्या रूंदीचे शेतकऱ्यांचे क्षेत्र संपादन केलेले आहे. करमाळा तालुक्यात मात्र या रस्त्यासाठी शासन काही ठिकाणी ३० मीटर तर काही ठिकाणी ४५ मीटर जमीन संपादन करत आहे. त्यामुळे शेतकरी म्हणतात.. शासनाने सर्रास शेतकऱ्याची ४५ मीटर जमीन संपादीत करावी व पूर्वी संपादीत असलेले ७ मीटर क्षेत्र वगळता उर्वरित संपादीत होणाऱ्या जमिनीचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्यात यावा. अन्यथा शेतकरी न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत.


रेडि पझेशन मध्ये बुकिंग सुरु
आम्ही साकारणार... तुमच्या स्वप्नातील घर..!
रुबाबदार लोकांच्या रुबाबासाठी, रुबाबदार घर म्हणजे...
श्री डेव्हलपर्स
आता प्रॉपर्टी बुक करा, फर्स्ट क्लास जागेत...



- उपलब्ध सुविधा -
• 2BHK रो- बंगलोज • डबल मास्टर बेडरुम •
• स्वतंत्र प्रशस्त पार्किंग • स्वतंत्र कॉंक्रिट जिने •
• इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग पॉइंट •
• वास्तुशास्त्राप्रमाणे बांधकाम • आर. सी. सी. इमारत •
• सर्व ब्रॅन्डेड अमेनिटीज्सह दर्जेदार बांधकाम •
• स्वतंत्र व प्रशस्त पार्कींग व २४ तास पाणी •
• कंन्सील्ड ईलेक्ट्रीक फिटींग • डबलचार्ज टाईल्स व ग्रेनाईट •
• लाफ्ट इन किचन ॲण्ड बेडरुम •
• पावडर कोटेड ॲल्युमिनीयम ३ ट्रॅक स्लाईडिंग विंडो •
* त्वरित संपर्क करा : 8459392545
पत्ता -प्लॉट नं.३३,३४,३५, शाहूनगर, छोटु महाराज सिनेमा थेटर जवळ, करमाळा जि. सोलापूर
छोटु महाराज थेटर पासून २ मिनीट अंतरावर...
बायपास चौका पासुन १० मीटर अंतरावर

आयुष्य वाढवांयच ना...मग आरोग्य जपा अन् अनावश्यक बाबी टाळा..!

## संपादकीय.............................................!

# स्वत:चे अस्तित्व पाहिजेच !

प्रत्येक व्यक्तीला एक वेगळी ओळख असते. ती त्याने जपली पाहिजे अन्यथा त्या जगण्याला कोणताच अर्थ रहात नाही. याबाबतची एक छोटी गोष्ट वाचल्यानंतर त्याचा थोडसा अर्थ समजेल. गोष्ट तशी साधीच आहे, पण विचार करावयास लावणारी आहे. दोन उंदीर असतात. ते एकमेकाचे चांगले मित्र असतात. एकत्र राहतात, एकत्र खातात, फिरायला एकत्र.. सतत एकत्र.. एकमेकाला सोडत नव्हते. गावात शहरातून धान्याचा ट्रक आला. वेळ रात्रीची होती, त्यामुळे हमाल माल उतरण्यास आले नाही. या दोघा मित्रांना ट्रकची खबर लागली. दोघे ट्रककडे गेले. मनसोक्त धान्य फस्त केले व दोघा मित्रांनी काही धान्य पळवलेही. त्याचवेळी गावातील काही चोर आले व त्यांनी धान्याची पोती पळवण्याचे काम सुरू केले. ही चोराचोरी पाहून ट्रक चालकाने अचानक आपला ट्रक चालू केला व शहराकडे वळवला. त्यावेळी या दोन मित्रापैकी एकजण ट्रकमध्ये होता तर एकजण खाली होता. ट्रक वेगात सुरू झाल्याने ट्रक मधील उंदराला खाली उतरता येईना अन् खाली असलेल्याला ट्रकमध्ये चढता येईना. दोघांची ताटातूट झाली. जो शहरात गेला तो शहरी झाला अन् खेड्यात राहिला तो खेडूतच राहिला.काही वर्षानंतर शहरातील उंदीर हा माल वाहतुकीच्या ट्रकमध्ये बसून गावो गावी फिरू लागला. एक ना एक दिवस आपला मित्र मिळेल, असा त्याला विश्वास होता आणि तसेच झालेही. एक दिवस दोघे मित्र भेटले. खुप समाधान झाले. खेड्यातला मित्र म्हटला, "मित्रा तु आता इथच थांबायचं, तिकडे जायचे नाही." पण शहरी मित्र म्हणाला "अरे बाबा माझा सर्व परीवार शहरात, आता मला कसे येथे रहाता येईल. अधून मधून येत जाईल. तु पण माझ्याकडे चल.. बघ जरा शहर कसे आहे, खाण्याचे पदार्थ तर विचारू नको प्रचंड स्वादीष्ट असतात." एके दिवशी शहरी मित्राच्या आमंत्रणावरून खेड्यातील मित्र शहरात गेला. शहरात खायलातर खुप पदार्थ होते पण पदार्थापर्यंत जाताच येत नव्हते. लगेच कोणी ना कोणी यायचे आणि जीव वाचवून पळायचे. शहरी मित्र या वातावरणात सावरला होता, तो काही ना काही आणून खात होता पण खेडूत मित्र उपाशी राहीला. दुसऱ्या दिवशी तो गावाकडे निघाला. तो म्हणाला "बाबा येथे मोठे चविष्ट पदार्थ असलेतरी सतत मरणाची टांगती तलवार , मला नको रे बाबा हे शहर. आपले खेडेच बरे, साधे असलेतरी स्वातंत्र्य आहे, जगण्यात मजा आहे."

थोडक्यात काय तर कितीही भारी अथवा मोठी चांगली वस्तु असेल पण त्यावर मालकी दुसऱ्याची असेलतर त्यात मजा रहात नाही. नोकरी भारी असली तरी नोकरी ती नोकरीच असते. काहीही असो ते आपल्या स्वत:च्या मालकीचे असणे ही बाब निश्चीत्तच अल्हाददायक असते. स्वत:चे असताना ते सक्षमपणे केले पाहिजे, विचारपुर्वक आणि हुशारीने केले पाहिजे, अन्यथा स्वत:चे असूनही त्यात बरबादी झाली तर त्याला अर्थ रहात नाही. तालुक्यातील व्यवसायाचा विचार केला तर एक बाब प्रकर्षाने जाणवते. आपल्या तालुक्याच्या मालकीचे म्हणजे सहकारी तत्वावरील असलेले आदिनाथ व मकाई असे दोन सहकारी साखर कारखाने आहेत, त्याचा निश्चीत्तच अभिमान वाटत होता पण आज त्यांची स्थिती काय आहे..? मुळातच तालुक्यात चार साखर कारखाने हीच खरी व्यवसायीकता आहे. त्यातील विहाळ व देविचामाळ (पांडे) येथील खासगी तत्वावरील कारखाने निदान तग धरून तरी आहेत. पण आपल्या मालकीच्या कारखान्याची पुर्ण वाट लागली आहे. कामगार, ऊसउत्पादक शेतकरी यांची वाताहात झाली आहे. सहकारी कारखान्यातील अपयश पाहून अनेकजण नव्या सहकारी उद्योगात पडत नाही. एवढेच नव्हेतर अनेकजण स्वत:चा व्यवसाय करायलाही धाडस करत नाही, तर ते नोकरी करण्यावरच लक्ष देत आहेत. मालक होण्याची अपेक्षा करत नाही. खरं तर अलीकडे असाच एक ट्रेड निघाला आहे, आपण फक्त दुसऱ्याचं वैभव पहायचं. आपण आपलं काही निर्माण करण्याचा विचारच करत नाही. शिक्षणक्षेत्र पाहिलेतर जुन्या शिक्षण संस्था सोडल्यातर नव्याने शिक्षण संस्था उभ्या राहिल्या नाहीत. नाही म्हणायला इंग्रजी शाळांचं फॅड जोरात सुरू आहे. याशिवाय मकाईच्या समोर पुणे येथील व्यक्तीने मोठ्या प्रमाणात जमीन घेऊन तेथे दुध डेअरी सुरू केली पण तो उद्योग फसला, तसेच हिंगणी-भगतवाडी जवळ डेअरी, शेळी-मेंढीपालन व्यवसायाचा प्रोजेक्ट उभा केला. बांधकाम झाले पण तोही व्यवसाय गती धरू शकले नाही. पण या दोन्ही प्रकल्पासाठी ज्या भावात जमीन खरेदी केली त्या जमीनीची किंमत आज २५ पटीने वाढली आहे. त्यामुळे व्यवसाय न करताही संबधित लोक फायद्यात आहेत. अशाच प्रकारे हैद्रबादकडील व्यक्तीने निंभोरे ते वडशीवणे रस्त्यावर केम जवळ एक इथेनॉल फॅक्टीरी उभी केली पण ती ही फॅक्टरी पुढे सुरू होऊ शकली नाही. या उलट करमाळा-जेऊर रस्त्यावर झरे ते पोफळज हाद्दीत सुत गिरणी, मका स्टार्च फॅक्टरी, चॉकलेट निर्मिती उद्योग यांनी चांगले बाळसे धरले आहे. याउलट उजनी धरण आपल्या हद्दीत पण त्यातील मासेमारी व्यवसाय करण्यासाठी बाहेरचे लोक आहेत, कारण तो व्यवसाय आपला नाही असे ग्रहीत धरून आपण चाललो आहोत. त्यामुळे त्याला आपण दुय्यम स्थान देतो.

करमाळा शहरात सुरू झालेले फर्नीचर मॉल, मोठ्या बेकरी, भांडी मॉल हे बाहेरून आलेल्यांनी सुरू केले. जेऊर येथे परप्रांतीय तरूणांनी पाव निर्मितीचा व्यवसाय गेल्या १५ वर्षापासून सुरू केला आहे. ते तरूण पाव बनवतात व गावागावात दुकानदार व वडापाव विक्रेत्यांना नेहून विकतात. पुर्वीचे छोटे व्यावसायिकांचे धंदे बंद पडले. तसेच जेऊर येथे केळी, द्राक्ष, डाळींब उत्पादकांना खते व औषधे देणारे बाहेरचेच व्यावसायीक गेल्या १० वर्षापासून कार्यरत आहेत, त्यांचा धंदा एक नंबर आहे. माल चोख आणि शेताला भेटी यामुळे शेतकऱ्यांचा त्यांच्याकडे ओढा आहे.

करमाळा शहर व परीसरात हॉटेलींगमध्येही बाहेरचे लोक प्रस्थापीत झाले आहेत. पेट्रोलपंप, बांधकाम व्यावसायिकातही बाहेरचे लोक अग्रेसर आहेत. फरशी बसवणे, पीओपी करणे, फर्नीचर बनवणे, कलरींग करणे यासाठी बाहेरचे व्यावसायीक फीट्ट झाले आहेत. ब्लास्टींग, विहीर खोदणे, रस्ते बांधणे, खडी उत्पादन करणे, बोटींगमधून वाळू काढणे, स्वयंपाक, बॅन्ड, मंडप आदी कामे करण्यासाठी बाहेरचे लोक मोठ्या संख्येने आहेत. आम्ही तर फक्त छोटे व्यापार, छोटे उद्योग आणि तोट्यातील शेती व मोठ्या प्रमाणात नोकरी यापेक्षा वेगळे काहीच करत नाही. जरा हिंमत बांधून नव्या क्षेत्रात उतरण्याची गरज आहे. रिकाम्या औद्योगिक वसाहतीत आपले उद्योग उभे करण्याची आवश्यकता आहे. शेतीत नवे प्रयोग करण्याची, शेतीपुरक उद्योग उभारण्याची नितांत गरज आहे. इतरांना त्यांचे व्यवसाय करू द्या पण जरा थोडं आपलंही अस्तित्व ठेवण्याची गरज आहे.

आपल्या तालुक्यात अद्यापही शैक्षणिक क्षेत्र, आरोग्य क्षेत्र, कृषी पुरक व्यवसायाचे क्षेत्र, पर्यटन क्षेत्र, एक्सपोर्ट क्षेत्र, सोशल मिडीयाचे क्षेत्र अनेकांना खुणावत आहे. प्रचंड संधी उपलब्ध असताना आपले त्याकडे का लक्ष जात नाही , ही शोकांतिका आहे. अलीकडे केळीचा व्यापार चांगला सुरू आहे,पण ज्याची एक्सपोर्ट केळी होवू शकते त्यांना संधी आहे; पण ज्या शेतकऱ्याची स्थानिक बाजारात केळी जावू शकते, त्याला अद्यापही चांगले व्यापारी नाही, केवळ फसवाफसवी करणारे लोक आहेत. त्यामध्ये चांगला वाव आहे. कंदर भागात केळीसाठी कोल्ड स्टोरेज उभारले पण अन्यत्र अनेक पीकासाठी कोल्डस्टोरेजची गरज आहे. विशेषत: भाजीपाला, फळे ही मातीमोल भावाने जातात, त्यासाठी पर्याय देण्याची गरज आहे. बेदाणे निर्मितीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालू शकतो, असे एक ना अनेक व्यवसाय स्वत:साठी तालुक्यासाठी उभे करू शकतो, ते व्यवसाय उभे करून स्वत:चे व तालुक्याचे वेगळेपण जपण्याची गरज आहे.

पान १ वरून पुढे..

## जातेगाव ते टेंभूर्णी रस्त्याच्या कामासाठी प्रशासन सज्ज

अहमदनगर ते टेंभूर्णी या रस्त्यावरील ० ते ८०.६ म्हणजे नगर ते जातेगाव या अंतराचे काम परिपूर्ण झाले आहे. जातेगाव ते टेंभूर्णी म्हणजे ८०.६ किलोमीटर ते १३९.७ किलोमीटर असे ५९.१ किलोमीटर अंतराचे काम राहिलेले आहे. हे काम करण्याबाबत सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने २८ जानेवारी २०२५ ला राजपत्र प्रसिध्द केले यात करमाळा शहर व जेऊर येथील संपादीत होणाऱ्या जमिनी यातील शेतकऱ्यांची नावे व संपादनाचे क्षेत्र, जमिनीचे गट नंबर हे प्रसिध्द केले आहे. या रस्त्याच्या संपादनास मांगी व अकोले खुर्द येथील शेतकऱ्यांचा विरोध आहे.

## सावडी येथे २० फेब्रुवारी पासून शिवमहापुराण कथा

करमाळा(सं.प्र.): महाशिवरात्री निमित्त श्री हिराभारती महाराज मठ, सावडी येथे २० ते २७ फेब्रुवारी या कालावधीत संगीतमय शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प.माधव महाराज रसाळ यांच्या सुश्राव्य वाणीतून सदरची कथा सायंकाळी आठ ते ११ या वेळेत सांगितली जाणार आहे.

२० फेब्रुवारीला श्री शिवपुराण महात्म्य, चंचुला कथा, श्रवण विधी., २१ फेब्रुवारीला सनतकुमार-व्यास संवाद, ब्रह्मा-विष्णू विवाद, शिवलींग पुजन., २२ फेब्रुवारीला श्री नारद तप, विष्णु उपदेश, शिवपुजेत बेल, जल, पुष्प यांचे महत्व., २३ फेब्रुवारीला सृष्टी उत्पत्ती कथा, गुणनिधी कथा, कुबेर ऊत्पत्ती., २४ फेब्रुवारीला सती चरित्र, संध्या चरित्र, शिव-पार्वती विवाह., २५ फेब्रुवारीला कार्तिक स्वामी जन्म कथा,गणपती विवाह, नंदी कथा., २६ फेब्रुवारीला बारा जोर्तिलिंग कथा, शिवरात्र विधी, अन्नदान, जलदान महात्म्य, ऊपमन्यु कथा, श्रीकृष्ण पुत्र प्राप्ती, मुनी मोक्ष, जलसींपन विधी आदी विषयावर ही शिवमहापुराण कथा सांगितली जाणार आहे. २७ फेब्रुवारीला सकाळी १० ते १२ रामेश्वर महाराज मगर (नावडीकर) यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. तरी शिवमहापुराण कथेचा लाभ करमाळा तालुक्यातील भाविकांनी घ्यावा; असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

### नावात बदल

करमाळा, ता.करमाळा येथील कमलेश राजेश रच्चा यांचे इंग्रजी नाव Kamlesh Rajesh Rachcha व १० वीचा दाखला, मार्कशीट व १२ वीचे मार्कशीट, ड्रायव्हींग लायसन्स व जातीचा दाखला यावर Kamlesh Rajesh Raccha असे आहे. वरील दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे. याबाबत प्रतिज्ञापत्र केले आहे.

**...कमलेश राजेश रच्चा, करमाळा. मो.७७७५८८३६३६**

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानला 'महाराष्ट्र एनजीओ आयकॉन' पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.): रावगाव येथील प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानला ज्ञानरचना सोशल फाउंडेशन ठाणे या संस्थेचा 'महाराष्ट्र एनजीओ आयकॉन' पुरस्कार पद्मश्री पुरस्कार प्राप्त राहिबाई सोमा पोपेरे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामदास कांबळे म्हणाले, की फाउंडेशनच्या माध्यमातून दिला गेलेला पुरस्कार अत्यंत तळागाळामध्ये काम करणाऱ्या संस्थेचा व कार्यकर्त्यांचा पुरस्कार आहे. या पुरस्कारामुळे भविष्यात काम करण्यासाठी ऊर्जा प्राप्त झाली आहे. भविष्यात सामाजिक कार्याच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य कसं करता येईल हाच संस्थेचा संकल्प असेल; असे कांबळे यांनी सांगितले. यावेळी मुक्त पत्रकार/लेखिका सरोज आलाट, स्पर्श सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा शितल साळवे, खजिनदार अमोल आलाट, ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या डायरेक्टर सुप्रिया चौधरी, नितीन साळवे, सारीका शेलार आदी मान्यवर उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय स्तरावरील अबॅकस परीक्षेत विवान मेहेर याचे यश



करमाळा (सं.प्र.): पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील अबॅकस परीक्षेत फर्स्ट लेवल मध्ये पांडे येथील विवान दिनेश मेहेर याने दहा मिनीटात ७५ गणिते सोडवून विक्रमांचा उच्चांक केला व प्रथम क्रमांक मिळवला आहे.

विवान मेहेर हा करमाळा नगरपरिषद सेंट्रल स्कुल मुले नं.१ चा विद्यार्थी असून त्याच्या या यशात शाळेच्या मुख्याध्यापिका सुनंदा माने व वर्गशिक्षिका शितोळे मॅडम यांचाही मोलाचा सहभाग आहे. विवान यास मुथा अबॅकस अॅकडमीच्या ज्योती मुथा यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे.





प्रियंका आय केअर हॉस्पीटल

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेंट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझार सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद | वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर


# रोशेवाडी येथे १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबीर

करमाळा(सं.प्र.): प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय करमाळा व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत १६ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत 'युथ फॉर भारत व डिजीटल साक्षरतेसाठी युवक' या संकल्पनेवर आधारीत रोशेवाडी येथे विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबीराचे उद्घाटन १५ फेब्रुवारीला दुपारी दोन वाजता सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठानच्या चेअरमन पद्मजादेवी मोहिते-पाटील व ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष अॅड.डॉ.बाबूराव हिरडे यांचे हस्ते होणार आहे. या शिबीरात स्वच्छ भारत अभियान, जलसंवर्धन, शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास, डिजीटल साक्षरता, महिला सबलीकरण व सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, वृक्षारोपण, मतदान जनजागृती, बालविवाह, अंधश्रध्द निर्मुलन आदी सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच प्रा.नितीन तळपाडे, कपिल भालेराव, अनिल माने, स्त्रीरोग तज्ञ डॉ.कविता कांबळे, डॉ.प्रविण देशमुख आदी मान्यवरांचे व्याख्यानाचा कार्यक्रम होणार आहे. १७ फेब्रुवारीला आरोग्य शिबीर घेतले जाणार आहे. २१ फेब्रुवारीला दुपारी साडेबारा वाजता शिबीराची सांगता डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत होणार आहे.


डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.) यांचा

अनुजा दातांचा दवाखाना






उपलब्ध सुविधा...






- स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
- पोर्टेबल एक्स-रे
- वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
- लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
- दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
- वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
- दात काढणे
- शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
- इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
- दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
- डेंटल इम्पलांटच्या सहाय्याने दात बसवणे
- पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
- जबड्याच्या आजारांचे निदान
- रूट कॅनल ट्रीटमेंट
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
- पुढील दातांमधील गॅप बंद करणे
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
- दात पांढरे/शुभ्र करणे
- इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
- तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग
- मुख कर्करोग निदान

कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.

# गजानन महाराज मंदिरात २० फेब्रुवारीला प्रगट दिन उत्सव

करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातील बायपास रोड, एस.टी.कॉलनी येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात २० फेब्रुवारीला प्रगट दिन उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त १७ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथाचे सामुदायिक पारायण दररोज सकाळी दहा ते एक यावेळेत आयोजित करण्यात आले आहे. प्रगट दिन उत्सव २० फेब्रुवारीला होणार असून यावेळी पहाटे पाच ते साडेसहा काकडा व आरती, सहा ते आठ रूद्राभिषेक, साडेदहा ते साडेबारा ह.भ.प.गणेश महाराज भुरे (कारलेकर) यांचे किर्तन होणार असून त्यानंतर पुष्पवृष्टी व महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. तरी या कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; असे आवाहन श्री संत गजानन महाराज देवस्थान तर्फे करण्यात आले आहे.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स पोंधवडी, ता.करमाळा.

• नेपाळ दर्शन काशी, आयोध्या, प्रयागसह.. कालावधी : दि.२१/३/२०२५ ते ३/४/२०२५ (रेल्वे प्रवास ३ एसी) सहल खर्च रू.२७,५००

• गंगासागर दर्शन गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ कालावधी : दि.१७/४/२०२५ ते २५/४/२०२५ सहल खर्च : रू.१२,८००

• गुजरात दर्शन गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ पोरबंदर, द्वारका, गिर अभयारण्य कालावधी : दि.१/५/२०२५ ते ९/५/२०२५ सहल खर्च : रू.११,०००

• वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ. कालावधी : दि.१२/५/२०२५ ते २४/५/२०२५ सहल खर्च रू.३०,५०० (रेल्वे प्रवास ३ एसी)

• कन्याकुमारी दर्शन कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी कालावधी : दि.२६/५/२०२५ ते ४/६/२०२५ सहल खर्च : रू.१३,८००

• चारधाम दर्शन कालावधी : दि.१०/६/२०२५ ते २५/६/२०२५ सहल खर्च : रू.३५,०००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय



बुकींग सुरू

संपर्क श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह

डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)

उपलब्ध सुविधा.. • गरोदर माता तपासणी व उपचार • सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर • नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे • मासिक पाळीचे आजार निदान व उपचार • वंध्यत्व निवारण • सिझेरियन प्रसुती • गर्भशयाचे आजार निदान व उपचार • मेनोपॉज क्लिनिक

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)

• नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) • व्हेंटिलेटरची सोय
• बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) • CPAP • Pulsoximeter
• दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) • वाफेची सोय (Nebulizer)
• बाल दमा निदान व उपचार • सेंट्रल ऑक्सिजनची सोय • 02 Concentrator

गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

# भाजपा पदाधिकाऱ्यांचा न.पा.अधिकाऱ्यांना घेराव

## शहरातील विविध प्रश्नांवर तातडीने लक्ष घालण्याची मागणी



करमाळा(सं.प्र.) : शहरातील विविध समस्यांवर उपाययोजना करण्याबाबत भाजपा पदाधिकाऱ्यांनी करमाळा नगरपालिकेस निवेदन दिले. यावेळी पदाधिकाऱ्यांनी कार्यालयीन अधिक्षक कविटकर यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती करत घेराव घातला. शहरातील रस्त्यांची दुर्दशा, तुंबलेल्या गटारी, अस्वच्छता, धुळीची समस्या, मोकाट कुत्र्यांचा उपद्रव, जयप्रकाश नारायण टाऊन हॉल व येथील पुतळ्याची दुरावस्था, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा बेजबाबदारपणा, जीन मैदानातील अस्वच्छता आदी प्रश्नांची सरबत्ती करून यावर त्वरीत उपाययोजना करण्याची जोरदार मागणी भाजपा पदाधिकाऱ्यांनी केली. सर्व समस्यांवर तातडीने पावले उचलली नाहीतर भाजपाच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल; असाही इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला. कार्यालयीन अधिक्षक कवीटकर यांनी सर्व समस्यांचे लवकरात लवकर निवारण करण्यात येईल; असे आश्वासन दिले. यावेळी भाजपा सरचिटणीस जितेश कटारिया, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार, महिला आघाडी शहरप्रमुख रेणुका राऊत, किसान मोर्चाचे प्रदेश सचिव दिपक चव्हाण, जिल्हा सचिव नरेंद्रसिंह ठाकूर, माजी शहराध्यक्ष संजय घोरपडे, शहर उपाध्यक्ष सचिन चव्हाण, जेष्ठ भाजपा कार्यकर्ते प्रदीप देवी, मनोज कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# नवता वीर हिची राज्यस्तरीय ॲथलेटिक्स चॅम्पीयनशीप स्पर्धेसाठी निवड

करमाळा(सं.प्र.): शेलगाव क येथील रहिवाशी असलेले प्रा.इंद्रजीत वीर यांची कन्या नवता इंद्रजित वीर हिची शंभर मीटर धावणे या क्रिडा प्रकारासाठी महाराष्ट्र राज्य सब ज्युनियर ॲथलेटिक्स चॅम्पीयनशीप या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा पंढरपूर येथे होणार आहे. तिच्या निवडीचे स्वागत शेलगाव क ग्रामस्थांनी केले आहे.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051

करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर

• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका

प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252

पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

प्रोप्रा : सुनील भिमशंकर चिवटे

**गुंडाप्पा फटाका स्टॉल**


नामवंत कंपनीचे...
- तोफा, कलर तोफा
- ६० शॉट, १२० शॉट, २४० शॉट
- कागदी शॉट
- एक हजारी माळ, दोन हजारी माळ पाच हजारी माळ इ.

फटाके होलसेल दरात मिळतील

शॉपिंग सेंटर, गाळा नं.३, सागर थिएटरच्या समोर, गायकवाड चौक, करमाळा.

संपर्क : मो.9850746608 / 9763635707

# करमाळ्यात शिवजन्मोत्सवाची जय्यत तयारी - विविध कार्यक्रमांचे आयोजन



करमाळा(सं.प्र.): शिवजयंती उत्सव समिती करमाळा शहर व तालुका यांचे वतीने ३९५ व्या शिवजयंती ची तयारी जोरदार सुरु असून, शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १८ फेब्रुवारीला मध्यरात्री बारा वाजता फटाक्यांची आताषबाजी करून छत्रपती शिवरायांच्या नावाचा जयघोष करून १९ फेब्रुवारीच्या दिवसाची सुरूवात केली जाणार आहे.

शिवजयंतीदिवशी सकाळी सात वाजता दूध अभिषेक करून छत्रपती शिवरायांच्या मुर्तीस वंदन करून सकाळी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये करमाळा शहरातील प्राथमिक शाळा, हायस्कुल, कॉलेज तसेच ग्रामीण भागातील जि.प.प्राथमिक शाळा, हायस्कुल, कॉलेज मधील प्राध्यापक, विद्यार्थी यांच्या माध्यमातून लेझीम नृत्य, टिपरी नृत्य, ग्रुप डान्स व सामाजिक संदेश देणारे पथनाट्य सादर केले जाणार आहे. तसेच नवीन वक्ते व विचारवंत, वाचकवर्ग तयार व्हावेत; यासाठी भाषणेही घेतली जाणार आहेत. तसेच मल्लखांब, मर्दानी खेळ अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शिवजयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीरही घेतले जाणार असून, जास्तीत जास्त नागरीकांनी रक्तदान प्रक्रियेत सहभाग नोंदवावा; असे आवाहन शिवजयंती उत्सव समितीने केले आहे.

१९ फेब्रुवारीला सायंकाळी चार वाजता किल्लावेस, महादेव मंदिर येथून छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. याप्रसंगी मान्यवरांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करून मिरवणुकीचा शुभारंभ होणार आहे. या मिरवणुकीत जय गणेश डी.जे. साऊंड व लाईट पुणे, नागनाथ लेझीम संघ शेटफळ, चाऊस बॅन्ड वैजापूर, सुजित बॅन्ड वाशी, अमर बॅन्ड बारामती व करमाळा येथील रत्नाकभाई बॅन्ड, झंकर बॅन्ड, भाई-भाई बॅन्ड, दोस्ती बॅन्ड तसेच अनिकेत फोटोग्राफी, एस.के.लीड वाल व सीओ२ पेपर ब्लास्टर तसेच घोडे व उंट हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण असणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व मिरवणुकीतील सजावट माही डेकोरेशन व मराठा मंदिर डेकोरेशन हे करणार आहेत. तरी करमाळा शहर व तालुक्यातील शिवभक्त बांधवांनी सकाळी सात वाजता छत्रपती चौक करमाळा व सायंकाळी चार वाजता किल्लावेस महादेव मंदिर येथे उपस्थित रहावे; असेही आवाहन शिवजयंती उत्सव समितीने केले आहे.

**खुशखबर** मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात **खुशखबर**

**डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध**

बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ

**डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)**

**उपलब्ध सुविधा...**
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

**ओपीडी /ऑपरेशन ठिकाण**
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

**परिचय**
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



**ओपीडीचे वैशिष्ट्ये...**
- इंजेक्शन सुविधा
- लेझर सुविधा
- प्रभावी औषधी सुविधा
- मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
- मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
- पार्किंगची व्यवस्था
- आठवड्यातून दोनदा ओपीडी

**विशेष सुचना...** १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

**नाव नोंदणीसाठी संपर्क** मो.9763035862

**बार्शी** धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# इरा पब्लिक स्कुल मध्ये महिला पालक मेळावा संपन्न



करमाळा(सं.प्र.): जेऊर येथील न्यु इरा पब्लिक स्कुल मध्ये महिला पालक मेळावा संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ.शारदा सुभाष सुराणा उपस्थित होत्या. या मेळाव्यात महिलांनी आपल्या सुप्त गुणांचे प्रकटीकरण करण्याचा प्रयत्न केला. काहींनी उखाणे, गाणे, भारूडे यांचे सादरीकरण केले. तसेच खेळ पैठणीचा, संगीत खुर्ची, जोडी जोडीची उठाबशी, फुगा फुगवून त्यावर बसून फोडणे असे विविध महिलांचे खेळ घेण्यात आले. त्यानंतर डॉ.शारदा सुराणा यांनी मनोगत व्यक्त केले. खास महिलांसाठी असा मंच उपलब्ध करून दिल्याबद्दल न्यू इरा पब्लिक स्कुलचे सर्वांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अवसरे व चव्हाण मॅडम यांनी केले. उपस्थितांचे आभार घाडगे मॅडम यांनी मानले.

**प्लॉट विकणे आहे**

गणेशनगर मधील १४०० स्क्वे.फुट व आण्णासाहेब जगताप विद्यालय परिसरातील ९०० स्क्वे.फुटचा प्लॉट विकणे आहे.

संपर्क : मो.9423237685

**जागा विकणे आहे**

करमाळा शहरातील मेनरोड वरील अत्यंत मोक्याची असलेली जागा (२५ X ७०, एकूण १७५० स्क्वे.फुट, जुनी युनीयन बँक ऑफ इंडिया, शहा हॉस्पीटल समोरील) योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

संपर्क

मो.9881097828, 9822029420, 9822553464

महाराष्ट्रात प्रथमच...

गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्याप्रमाणे !

२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर

एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस

**सुभद्रा पॉवर सोल्युशन्स**

प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337

श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719

शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

**डॉ.शेलार हॉस्पिटल**

नवीन प्रशस्त जागेत **स्थलांतर** झाले आहे.



स्थलांतरीत पत्ता : ICICI बँकेच्या पाठीमागे, श्रावणनगर, करमाळा.

टीप : मेडिकल फर्निचर विकणे आहे.

संपर्क : डॉ.शेलार (9922957895)

**पुनम एजन्सी**

अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक

Ambuja Cement

- बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
- प्लंबींग
- हार्डवेअर

स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट

होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.


अखंड हिंदुस्तानचे दैवत
छत्रपती शिवाजी महाराज
यांच्या जयंतीनिमित्त
कार्यक्रमाची रुपरेषा
बुधवार दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी
स्थळ : छत्रपती चौक, करमाळा, जि.सोलापूर
छत्रपती शिवाजी महाराज अभिषेक स. ७.०० वा.
कै.साधनाबाई नामदेवराव जगताप प्राथमिक मुलींची शाळा, करमाळा
नामसाधना सेंट्रल स्कूल मुलांची शाळा नं.१, करमाळा छ.शिवाजी महाराज यांचे गीत
डॉ.आंबेडकरवादी चळवळ लेझीम पथक, करमाळा.
महात्मा गांधी विद्यालय,करमाळा
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करंजे, ता.करमाळा
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पोथरे, ता.करमाळा
गुरुकुल पब्लिक स्कुल, करमाळा
ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूट,करमाळा (लेझिम)
एकलव्य आश्रम शाळा, करमाळा
नवभारत इंग्लिश स्कुल, करमाळा.
नोबल इंग्लिश मेडियम स्कूल, करमाळा गीत : युगत मांडली
रायबा साउंड्स, करमाळा.
त्रिमूर्ती स्पोर्ट्स क्लब, करमाळा.(मल्लखांब)
वीर शिवाजी मर्दानी खेळ,करमाळा
शौर्य पुरस्कार २०२५
चि.देवांश सागर वडे
BLOOD DONATION
भव्य रक्तदान शिबीर स. ८.०० वा.
॥ भव्य मिरवणूक ॥
● बुधवार, दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं.४.०० वाजता ●
स्थळ : किल्लावेस, करमाळा येथून मिरवणुकीस सुरूवात होईल.
जय गणेश 76+ पुणे
जय गणेश 76+ लाईट्स, पुणे
६ जून शिवराज्याभिषेक सोहळ्यात सन्मान झालेला शेटफळ (ना.) ता.करमाळा लेझीम संघ
माही डेकोरेशन, करमाळा
मराठा मंदिर डेकोरेशन,करमाळा
चाऊस बॅन्ड, वैजापूर
सुजित बॅन्ड, पारगाव, ता.वाशी
न्यू अमर बॅन्ड, बारामती
अ.रज्जाक भाई बॅन्ड, करमाळा
झंकार बॅन्ड नं. १, करमाळा
भाई भाई बॅन्ड, करमाळा
दोस्ती नं.1 बॅन्ड (लालाभाई) करमाळा
घोडे
Aniket R. Photography करमाळा
SK LED Wall, करमाळा
SK Co2 पेपर ब्लास्टर, करमाळा
उंट
पुर्ण कार्यक्रम व मिरवणुकीचे स्क्रिन वर व YouTube वर Live प्रक्षेपण
आयोजक
शिवजयंती उत्सव समिती
करमाळा शहर व तालुका


"प्रत्येक शब्दाने आपल्या मैफिलीचे गीत व्हावे..,
सूर तुमच्या मैफिलीचे दूरदूर जावे ।
तुम्हा पुढे ठेंगणे व्हावे त्या उंच अंबराने..,
साथ तुमची घावी यशाच्या प्रत्येक शिखराने ॥"
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
करमाळा येथील रहिवाशी
श्री.दिगंबर भगवान इंदुरे यांचे सुपुत्र,
पुणे जिल्हा शिक्षण मंडळ सेवक
सह. पतसंस्थेचे माजी चेअरमन
व आकुर्डी(पुणे) येथील रामकृष्ण
मोरे महाविद्यालयात सेवेत असलेले..
मा.श्री.सचिन दिगंबर इंदुरे
आपणांस दि.२० फेब्रुवारी रोजी
असलेल्या ५१ व्या वाढदिवसास...
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
● मोहन टिकोरे व परिवार, पुणे ● रविंद्र रसाळ व परिवार, जामखेड
● शिल्पा संजय आंग्रे व परिवार, पुणे
● बबनराव पाटुळे गुरूजी व परिवार, भोसे
● माऊली कदम व परिवार ● समस्त इंदुरे परिवार, करमाळा.


आशिर्वाद
लोकप्रिय आमदार
लोकनियुक्त सरपंच
चेअरमन
व्हा.चेअरमन
सचिव
श्री.दत्तात्रय रणसिंग
प्रा.विलास ठोकळ सर
लोकनेते नारायण (आबा) पाटील ग्रा.बि.सहकारी
पतसंस्थेच्या चेअरमन पदी प्रतिष्ठीत व्यापारी
श्री.परेशकुमार प्रविणकुमार दोशी
यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
व्हा.चेअरमन, सचिव, सर्व संचालक व कर्मचारी
लोकनेते नारायण (आबा) पाटील
ग्रा.बि.सहकारी पतसंस्था मर्या; जेऊर

# कॉलेज, होस्टल, कोर्सेससाठी उपयुक्त

## इमारत विकणे आहे



- ७०० स्क्वे.फुटाचे आठ व ५०० स्क्वे.फुटाचा एक फ्लॅट
- वास्तुशास्त्राप्रमाणे फ्लॅटचे बांधकाम
- प्रत्येक फ्लॅटला बाल्कनी
- पाणी साठविण्यास आठ हजार लिटरची टाकी
- टू-व्हीलर पार्किंगची सोय
- पुर्वेकडे आठ गुंठे ओपन गार्डन प्लॉट
- बिल्डींगच्या सुरक्षेसाठी कंपाउंडवॉल
- बिल्डींग जी प्लस चार असून प्रत्येक मजल्यावर दोन फ्लॅट.
- वरती जाण्यासाठी लिफ्टची सोय
- सदर इमारतीचे प्लॅनिंगच्या नियमानूसार बांधकाम
- कमलादेवीच्या मंदिरापासून पाच मिनीटाच्या अंतरावर
- प्रत्येक फ्लॅटमध्ये ग्रॅनाईटचे किचन ओटे व रॅक
- जिन्याची रुंदी चार फूट असून सर्व जिन्यांना ग्रॅनाईटचे टप्पे

संपर्क

| महेश सुर्यपुजारी | अजित साठे | नरेंद्र ठाकूर |
|---|---|---|
| मो.7709669288 | मो.9763046715 | मो.9423333975 |

पत्ता : गजानन हौसिंग सोसायटी, ७२ बंगल्याजवळ, संगोबा रोड, करमाळा.



राज्यात प्रथम



महाराष्ट्र लोकसेवा आयोग तर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेतून आमचे बंधू

# मा.श्री.तन्मय तानाजी काटुळे

यांची

## कर सहाय्यक (टॅक्स असिस्टंट)

पदी निवड झाल्याबद्दल व महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक

- ए.के.इन्शुरन्स अँन्ड फायनान्स, करमाळा.
  प्रोप्रा : अजितकुमार काटुळे मो.7588020891
- रिच फॅशन राशिनपेठ, करमाळा. प्रोप्रा.राहुल काटुळे
- जयदीप सांगडे व परिवार
- समस्त काटुळे परिवार शेलगाव क





ॲरिस्टो किड्स मार्फत पुणे येथे घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील अबॅकस वैदिक मॅथ्स परीक्षेत

# विवान दिनेश मेहेर

याने 'लेवल फर्स्ट' मध्ये

## प्रथम क्रमांक

मिळवल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक

- जगदंब एंटरप्रायजेस्, करमाळा.
- मुथा अबॅकस अकॅडमी, करमाळा
- समस्त मेहेर परिवार, पांडे
- बाळासाहेब मारूती मेहेर (माजी सरपंच, पांडे), दिनेश बाळासाहेब मेहेर
- शैलेश बाळासाहेब मेहेर (बँक मॅनेजर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया)
- डॉ.हितेश बाळासाहेब मेहेर (MBBS. MS Ophthalmology)
- कु.कैवल्य, कु.नक्ष



तुमचा जुना मोबाईल द्या, त्या बदल्यात

# नवीन मोबाईल EIM वर घ्या !



मोबाईल सोबत हमखास गिफ्ट

**भव्य मोबाईल एक्सचेंज ऑफर**

0 Down Payment
0 % Interest Rate

- मार्केटपेक्षा कमी दर
- मोबाईल सोबत हमखास गिफ्ट
- त्वरीत फायनान्स उपलब्ध

**आवश्यक कागदपत्रे**

- आधारकार्ड
- बँक पासबुक
- पॅनकार्ड
- डेबीट कार्ड

सर्व फायनान्स उपलब्ध

BAJAJ FINSERV | TVS CREDIT

आजच भेट द्या आणि मिळवा

आपला आवडीचा 'स्मार्ट फोन' तेही बजेटमध्ये !

# श्री संत गजानन महाराज मोबाईल

जय महाराष्ट्र चौक जवळ, मेनरोड, करमाळा.(9420920007)

## निखिल चांदगुडे यांच्या महिला उद्योग प्रदर्शन उपक्रमाने

# उद्योजक महिलांसाठी एक प्लॅटफॉर्म उपलब्ध : दिग्विजय बागल




करमाळा (सं.प्र.) : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त निखिल चांदगुडे यांच्या माध्यमातून छोटू महाराज थिएटर येथे भरवलेल्या प्रदर्शनामुळे उद्योगी महिलांना एक प्लॅटफॉर्म उपलब्ध झाला आहे. या प्रदर्शनाचा अनुभव घेऊन महिला भगिणी भविष्यात निश्चितच उचित ध्येय गाठतील; असा विश्वास सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व शिवसेना नेते दिग्विजय बागल यांनी व्यक्त केला.

युवा सेनेचे जिल्हा समन्वयक निखिल चांदगुडे यांनी भरवलेल्या महिला उद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन दिग्विजय बागल यांचे हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील,ॲड.नाना कारंडे, पै.विकी शिंदे, सतीश नीळ, अनिल अनारसे, प्रा.शिवाजीराव बंडगर, बाबासाहेब सरडे, मुकबधीर शाळेचे मुख्याध्यापक काळे, संतोष लाड, योगेश सोरटे, भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यत: महिला उद्योजकांसाठी असलेल्या या प्रदर्शनात महिलांनी लावलेले विविध स्टॉल पाहता चांदगुडे यांचा हा उपक्रम नवोदित महिला उद्योजकांसाठी एक पर्वणीच होती. या प्रदर्शनातील स्टॉलमध्ये अनेक महिला उद्योजकांनी छोट्या-मोठ्या वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. यात फ्राईड मोमोज, फ्राईड राईस, दालचा राईस, आईस केक, भेळ, पाणीपुरी, साखरेचे रूखवत असे तयार खाद्यपदार्थांसह शेवया, कुरड्या, पापड्या, सांगडे इ. उन्हाळी वाळवणीचे पदार्थ आणि चटणी, लोणचे, मसाला हे पदार्थ विक्रीचे स्टॉल होते. या सोबतच ब्युटी प्रॉडक्ट्स, इमिटेशन ज्वेलरी आणि लग्नसराईत विशेष आकर्षण ठरणारे आरी वर्कचे ब्लाऊज विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. याशिवाय प्रधानमंत्री सूर्य घर, घरगुती वापराचे छोटे गॅस, शेगड्या, रॉयल इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून घरासाठी विविध शासकीय सवलती सुलभ कर्ज योजना उपलब्ध असून या प्रदर्शनात स्वप्नातील घराचे बुकींग करणाऱ्या प्रत्येक ग्राहकास इलेक्ट्रीक स्कुटी भेट दिली जाणार आहे.

करमाळा शहरात प्रथम सुरू..!
**पाटील**
Reg no.42433
**डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील**
( Clinical Cosmetologist & Trichologist )
**स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक**
**उपलब्ध सुविधा**





- **त्वचा :** P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, ॲंटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, बांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
- **केस :** P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे

● सर्व आजारांवर उपचार ● रक्त लघवी तपासणी ● लहान मुलांना वाफ देणे ● सांधेदुखी, कंबरदुखी ● होमिओपॅथिक उपचार


**पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573**

# कर सहाय्यक परीक्षेत तन्मय काटुळे राज्यात प्रथम



करमाळा(सं.प्र.) : शेलगाव(क) येथील तन्मय तानाजी काटुळे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या कर सहाय्यक (टॅक्स असिस्टंट) परीक्षेत ३०२ गुण प्राप्त करून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

तन्मय काटुळे याचे प्राथमिक शिक्षण करमाळा नगरपरिषद शाळा, माध्यमिक शिक्षण कर्जत येथील अमरनाथ विद्यालयात तर अकरावी व बारावीचे शिक्षण कर्जत(जि.नगर) येथील दादा पाटील महाविद्यालयात झाले. त्यानंतर काटुळे यांनी म.फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत डॉ.अण्णासाहेब शिंदे कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी राहुरी येथे ॲग्रीकल्चर इंजिनिअरींगची पदवी प्राप्त केली. या यशामध्ये आई-वडील यांचेसह मित्र परिवार,नातेवाईक, ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे तन्मय काटुळे यांनी सांगितले.







**भैरवनाथ यात्रा ट्रॅव्हल्स**

**उत्तर भारत तीर्थयात्रा**

● जाण्याची तारीख : दि.२३/३/२०२५ ● येण्याची तारीख : दि.६/४/२०२५

**यात्रेचा एकूण खर्च : १५,०००/-(एका व्यक्तीस)**

**यात्रेमधील धार्मिक तसेच प्रेक्षणीय स्थळे**

**महाराष्ट्र :** ● कुंभारगाव ते राशिन : यमाई देवी मंदिर ● शिर्डी : श्री साईबाबा दर्शन, शनी दर्शन ● नाशिक : पंचवीट, त्र्यंबकेश्वर ● वणी : सप्तश्रृंगी माता दर्शन

**गुजरात :** ● निळकंठेश्वर महादेव मंदिर ● गिरनार पर्वत : दत्तमंदिर, अंबामाता मंदिर ● सोरटी सोमनाथ : बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ● भिल्लक तीर्थ : भगवान श्रीकृष्णाच्या पायाला बाण लागलेले ठिकाण ● द्वारका : श्रीकृष्ण नगरी, गोपी तलाव, बेट द्वारका, नागेश्वर मंदिर

**मध्यप्रदेश :** ● उज्जैन : श्री महाकालेश्वर दर्शन ● ओंकारेश्वर (१२ ज्योतिर्लिंग पैकी एक)

**उत्तरप्रदेश :** ● चित्रकूट : श्री प्रभु रामचंद्र वनवासात राहिलेले स्थान, श्रीराम व भरत भेट ठिकाण ● अत्री ऋषी आश्रम ● गुप्त गोदावरी : गुप्त गोदावरी गुफा दर्शन ● प्रयागराज : त्रिवेणी संगम स्नान, निद्रिस्त हनुमान दर्शन ● श्री क्षेत्र आयोध्या : शरयुस्नान, प्रभुरामचंद्र जन्मभुमी दर्शन, हनुमान गढी दर्शन ● श्री क्षेत्र काशी : काशी विश्वनाथ दर्शन, गंगा स्नान, काळभैरवनाथ दर्शन, ● अन्नपूर्णा माता मंदिर, धुंडीराज गणपती, हरिश्चंद्र घाट ● सारनाथ : सारनाथ स्तंभ

**महाराष्ट्र :** ● रामटेक, शेगाव : गजानन महाराज मंदिर ● पैठण : संत एकनाथ महाराज मंदिर ● घृष्णेश्वर (१२ ज्योतिर्लिंग पैकी एक)

**यात्रेमध्ये यात्रेकरूंसाठी नियम**

१. वरील खर्चात एक वेळ चहा, दोन वेळ जेवण याचा समावेश आहे.
२. संपूर्ण यात्रा बस प्रवासाने होईल.
३. राहण्याची व्यवस्था धर्मशाळेत किंवा सोयीनूसार केली जाईल.
४. वरील रकमेत रिक्षा खर्च ज्याचा-त्याचा असेल.
५. यात्रा राशिनपासून सुरू व राशिनमध्ये समाप्त होईल.
६. यात्रा सफल होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.
७. यात्रेच्या नियोजनात बदल करण्याचा सर्वस्वी अधिकार व्यवस्थापकास राहील.
८. सोबत येताना आपल्याला लागणारी औषधे तसेच पहिल्या एक दिवसाचे जेवण घेऊन येणे.
९. ॲडव्हान्स रक्कम रू.५०००/- राहील. तसेच यात्रा सुरू होण्यापूर्वी संपूर्ण रक्कम जमा करावी.

**यात्रा व्यवस्थापक : श्री.आजिनाथ गायकवाड, कुंभारगाव (मो.८७६६९७८१२८)**

आमचे मित्र **श्री.शिवकुमार(शेठ) चिवटे** यांच्या सौभाग्यवती
**सौ.ऋतुजा हिंगमिरे(चिवटे)**
यांची TCS मार्फत घेण्यात आलेल्या **'ग्राम महसुल अधिकारी' (तलाठी)** पदी निवड झाल्याबद्दल...

हार्दिक अभिनंदन





**शुभेच्छुक**
**सूरज(भैय्या) बाळासाहेब इंदुरे व परिवार**
भवानीपेठ, करमाळा., जि.सोलापूर

# आठवड्यात एक युवक व दोन युवती बेपत्ता

करमाळा : या आठवड्यात तालुक्यातील एक युवक व दोन युवती बेपत्ता झाल्याची नोंद करमाळा पोलीसात झाली आहे. ११ फेब्रुवारीला रिटेवाडी येथील २६ वर्षाची विवाहिता बेपत्ता झाली आहे. राहत्या घरातून ती निघून गेल्याची करमाळा पोलीसात नोंद करण्यात आली आहे. तर १३ फेब्रुवारीला करमाळा शहरातील किल्ला विभागातील १९ वर्षाची युवती घरातून निघून गेली आहे. तर दहिगाव येथील ३१ वर्षाचा युवक घरातून निघून गेल्याबाबत पोलीसात नोंद करण्यात आली आहे. या बेपत्ता झालेल्या युवकांचा शोध पोलीस घेत आहेत.

घोलप हार्डवेअर
कृषी संदर्भातील सर्व साहित्य मिळेल.
• प्लंबिंग मटेरियल
• नट बोल्ट
• मग • झाडू • टब
• कॅरेट • ताडपत्री
• नायलॉन दोर
• प्लास्टीक कागद
संपर्क : मो.9922111204
पत्ता : रिलायन्स पेट्रोलपंपासमोर, बायपास रोड, शाहुनगर, करमाळा.

# मुलीच्या वाढदिवसाच्या कारणावरून पती व दीराकडून मारहाण

करमाळा : मुलीचा वाढदिवस कोठे साजरा करायचा.. यावरून नवरा, दीर व सासू यांनी महिलेस लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली आहे. हा प्रकार १० फेब्रुवारीला दुपारी पावणेदोन वाजता फुंदेवाडी (ता.करमाळा) येथे घडला आहे. या प्रकरणी रोहिणी अतुल फुंदे (रा.फुंदेवाडी) हिने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझी मुलगी आरोही हिचा वाढदिवस कोठे करायचा.. अशी चर्चा सुरू असताना करमाळा येथे वाढदिवस साजरा करायचा.. असे म्हटले असता दिर राहुल फुंदे याने तु मालक झालीस काय.. असे म्हणून शिवीगाळ करू लागला. त्यानंतर नवरा अतुल फुंदे हा मध्ये आला, त्याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तर सासू सुमन फुंदे हिने केसाला धरून शिवीगाळ केली. त्यानंतर नवऱ्याने मला लाथ मारली व मी भिंतीवर पडून डोकेस मार लागला व बेशुध्द पडले. त्यानंतर मला उपजिल्हा रूग्णालय करमाळा येथे माझा संदीप वसंत जायभाय याने ॲडमीट केल्याचे समजले. या प्रकरणी पोलीसांनी पती, दीर व सासू या तिघांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# कात्रज येथे संत रोहिदास महाराज यांची जयंती



करमाळा(सं.प्र.) : कात्रज येथे संत रोहिदास महाराज तरूण मंडळाच्या वतीने संत रोहिदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी समाजभूषण शाहीर सुरेशराव सुर्यवंशी यांचा संत रोहिदास महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारीत पोवाड्याचा कार्यक्रम झाला. शाहीर सुर्यवंशी यांना चर्मकार समाजाचे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण सोनवणे व उपसरपंच अजय शिंदे यांचे हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# सामुदायिक विवाह सोहळ्यात वधू-वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी उपस्थित रहावे - श्री.चिवटे



करमाळा(सं.प्र.): श्रीराम प्रतिष्ठान, करमाळा आयोजित सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याची तयारी झाली असून १६ फेब्रुवारीला २५ हून अधिक जोडपी विवाह बंधनात अडकणार आहेत. या नवविवाहित जोडप्यांना शुभाशिर्वाद देण्यास राज्यातून सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी करमाळा तालुक्यातील जास्तीत जास्त नागरीकांनीही नव वधू-वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी उपस्थित रहावे; असे आवाहन श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश चिवटे यांनी केले आहे.

ॲड.सचिन बाबूराव हिरडे
बी.ए.एलएल.बी., ॲडव्होकेट
वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
दि. १४ /२/२०२५

## • सावधानतेचा इशारा •

तमाम नागरीकांना विशेषत: करमाळा तालुक्यातील उंदरगाव व परिसरातील नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डी.सोलापूर,जिल्हा परिषद सोलापूर ,पंचायत समिती करमाळा, ग्रामपंचायत उंदरगाव हद्दीतील, मौजे उंदरगाव येथील शेतजमीन गट नं.७७/२ पैकी पश्चिम-दक्षिण कोपऱ्यातील, क्षेत्र - ०० हे. २० आर, आकार : ०० रू. २५ पैसे. यासी चतु:सीमा पूर्व - गट नं.७७/२ पैकी कॅव्हेटॉर यांची जमीन, दक्षिण - पुनर्वसन रस्ता, पश्चिम - बाभुळगाव ते कुंभेज फाटा रस्ता, उत्तर - गट नं.७७/२ पैकी ज्ञानदेव कुदळे यांची जमीन येणेप्रमाणे मिळकत ही आमचे अशिलाने दशरथ भगवान राऊत यांचेकडून दस्त क्र.४१४८/२०२३, दि.१७/८/२०२३ ला खुशखरेदी घेतलेली आहे. त्या दिवसापासून आमचे अशिलाचा सदर मिळकतीवर मालकी हक्काने कब्जेवहिवाट आहे. असे असताना सदर मिळकतीतील सहहिस्सेदार श्री.ज्ञानदेव नामदेव कुदळे रा.उंदरगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर हे चुकीची चतु:सीमा घालून याच गटातील म्हणजे गट नं.७७/२ पैकी पश्चिमेची क्षेत्र - ०० हे. २० आर, आकार - ०० रू. २५ पैसे अशी मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे सदर नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, ज्ञानदेव कुदळे यांचा मौजे उंदरगाव, ता.करमाळा येथील जमीन गट नं.७७/२ मध्ये पश्चिम- उत्तर कोपऱ्यात ०० हे. २० आर यासी चतु:सीमा पुर्व - गट नं.७७/२ पैकी धनाजी नाळे यांची जमीन, दक्षिण - गट नं.७७/२ पैकी धनाजी नाळे यांची जमीन, पश्चिम - बाभुळगाव ते कुंभेज फाटा रस्ता, उत्तर - बापू कुदळे यांची जमीन. अशी त्यांची कब्जेवहिवाट असताना ते चुकीची चतु:सीमा घालून सदरची मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे कोणीही चुकीच्या चतु:सीमेची मिळकत खरेदी करू नये. असा कोणी बेकायदेशीर खरेदी व्यवहार केल्यास त्या मिळकतीचा कब्जा खरेदीदारास मिळणार नाही ; याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे.

ता.१४/२/२०२५

**धनाजी किसन नाळे**
रा.उंदरगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

कामगार पाहिजे
आमच्या पेट्रोलपंपावर पेट्रोल देण्यासाठी तसेच अकौटींगचे काम करण्यासाठी कामगाराची आवश्यकता आहे.
गरजूंनी संपर्क करावा
संपर्क
श्रीरंग पेट्रोलियम
नगररोड, करमाळा., जि.सोलापूर
मो.नं.9834506584

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह
साऊथ इंडियन: इडली सांबर, उडीदवडा सांबर, उत्तप्पा, डोसा
नाष्टा: पुरी भाजी, मिसळ पाव, पोहे/उपमा, दहीवडा/शिरा
स्नॅक्स: पावभाजी, तवापुलाव, सँडविच, फिंगर चिप्स
चाट: पाणीपुरी, स्पे.भेळ, रगडा पॅटिस, राज कचोरी
स्विट: पेढा, बर्फी, लाडू, जामून, मैसुरपाक, काजू कतली
नमकिन: फरसाण, शेव, स्पे.चिवडा, पापडी
डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

# ज्येष्ठांचा आधार घेत सर्वांनी आनंदी जीवन जगावे : गणेश शिंदे

## विलासराव घुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त 'भविष्यावर बोलू काही' विषयावर व्याख्यान





करमाळा(सं.प्र.) : ज्येष्ठांचा आधार घेत भविष्यात काय होईल; याचा अंदाज घेऊन सर्वांनी आनंदी जीवन जगले पाहिजे; असे प्रतिपादन व्याख्याते गणेश शिंदे यांनी केले.

विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांच्या ७० व्या वाढदिवसा-निमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमात 'भविष्यावर बोलू काही' या विषयावर श्री.शिंदे बोलत होते. यावेळी यशवंत परिवारच्या वतीने विलासराव घुमरे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना शिंदे म्हणाले, की विलासराव घुमरे हे अभ्यासू व्यक्तीमत्व आहे. भविष्याचा अंदाज घेऊन त्यांनी करमाळ्यात शैक्षणिक कार्य केले आहे. महाविद्यालयात नोकरी करत असताना मिळणाऱ्या पगारातून ते बाहेरगावी असलेल्या मित्रांना मदत करत होते. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकला पाहिजे, तो आर्थिक सक्षम झाला पाहिजे; अशी त्यांची कायम धारणा राहिली आहे. त्यातूनच त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले आहेत. राजकारणातही त्यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांना किंगमेकर अशी ओळख मिळाली.

पुढे बोलताना शिंदे म्हणाले, की जुन्याचा आधार घेऊन कायम भविष्याचा अंदाज घेऊन आनंदी जीवन जगले पाहिजे. आई-वडील यांच्या कष्टाची जाण ठेवून शिक्षण घेत चांगली नोकरी किंवा व्यवसाय करत आयुष्यात पैसा कमवणे आवश्यक आहे. पैशाला काही किंमत नाही असे कोण म्हणत असेलतर ते चूक आहे. चांगले जीवन जगण्यासाठी पैसा आवश्यक आहे, मात्र तो प्रामाणिक कष्ट करून कमवणे आवश्यक आहे. व्यवसायात मार्केटींग महत्वाचे असून त्यासाठी कौशल्य पाहिजे. हे पटवून देताना शिंदे यांनी उदाहरणे देवून उपस्थितांची मने जिंकली.

७० व्या वाढदिवसानिमित्त घुमरे यांचा अनेक मान्यवरांनी सत्कार केला. यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य दिग्विजय बागल, आदिनाथ कारखान्याचे माजी चेअरमन तात्यासाहेब मस्कर, बारामती ॲग्रोचे सुभाष गुळवे, सोलापूर जिल्हा दूध संघाचे माजी संचालक राजेंद्रसिंह राजेभोसले, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख महेश चिवटे, रमेश कांबळे, विवेक येवले, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, गुलाबराव बागल, उद्योजक आशुतोष घुमरे, ॲड.विक्रांत घुमरे, डॉ.सौ.रुपाली घुमरे, सौ.कोमल घुमरे, नातू चि.राणा, कु.रुवी, अन्विका, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल. बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, अनिल साळुंखे तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ.राजेंद्र दास, सुरेश शिंदे, चंद्रशेखर शिलवंत, डॉ.अनिल व्हटकर यांचेसह यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

विलासराव घुमरे यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त यशवंत परिवाराच्या वतीने महाविद्यालयामध्ये यशवंत युवा महोत्सव आयोजित केला होता. या महोत्सवांतर्गत रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, लिंबू चमचा, मिस मॅच डे, रॅम्प वॉक, मिस वायसीएम, शेलापागोट्या, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. सामाजिक उपक्रमांतर्गत वृक्षारोपण व रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे माजी कुलगुरू अरूण अडसुळ यांचे हस्ते व भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल-कोलते यांचे प्रमुख उपस्थितीत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

विजयश्री सभागृहमध्ये विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, सर्व विश्वस्त, शिक्षक, कर्मचारी यांचे वतीने विलासराव घुमरे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून वा दूरध्वनीद्वारे संपर्क साधून घुमरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

सा.कमलाभवानी संदेश
वार्षिक वर्गणी
२०० रू. भरून घरपोच
अंक मिळवा..!



श्वेता
गिफ्ट & टॉईज
2025 या नवीन वर्षात
१९ फेब्रुवारी शिवजयंतीनिमित्त
जम्बो थार गाडीवर विशेष
डिस्काऊंट ऑफर
आपल्या लाडक्या
मुला-मुलींच्या वाढदिवसानिमित्त
आकर्षक रिमोट कंट्रोल
इलेक्ट्रीक थार (जीप)
भेट द्या !


पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
(9822058106, 7798307085)

लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स



होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर
प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी
कॉटन साडी, पार्टीवेअर साडी,लेडीज टॉप व कुर्ती,
लेगीज, किड्स वेअर योग्य दरात मिळतील.
टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.
विशेष ऑफर : कॉटन परकर फक्त १०० रू. मध्ये मिळेल
पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध
पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)

# पाणाड्या...

करमाळा (तेजेश ढेरे याजकडून) : पाणाड्या म्हटलं की जमीनीत पाणी पाहणारा असा अर्थ होतो. पण मी ज्या पाणाड्याबद्दल सांगत आहे तो म्हणजे गावात पाणी टाकणाऱ्या पाणाड्याबद्दल !

कोणता व्यवसाय कोणी करावा, हे ज्याच्या त्याच्या हातात आहे. अनेकवेळा व्यवसाय सुरू केला जातो आणि वर्ष-दोन वर्षात तो बंदही पडतो. पण मी ज्या पाणाड्याबद्दल सांगत आहे, त्यांचा व्यवसाय तब्बल ४६ वर्षापासून अव्याहतपणे सुरू आहे.अगदी कोरोनाच्या काळातही हा व्यवसाय सुरू होता. हा व्यवसाय चालविणारा पाणाड्या म्हणजे कोर्टी येथील मुबारक आब्बासभाई शेख हे आहे. १९७९ ला वयाच्या नवव्या वर्षी अगदी शाळेत चौथीला असताना त्यांनी गावात घागरीने मागेल त्याला पाणी देण्याचे काम सुरू केले, ते अद्यापही सुरू आहे.

मुबारक शेख हे सायकलवर एकाचवेळी १५ लिटरच्या सात घागरी भरून पाणी गावात आणतात आणि गरजूंना देतात. एक घागर अवघ्या पाच रूपयात देतात. उन्हाळ्यामध्ये दिवसभरात कमीत कमी ५० ते ६० खेपा म्हणजे जवळपास ५ ते



६ लिटर पाणी लोकांच्या घरपोच करतात. या व्यवसायावरच त्यांनी स्वत:चा बंगला बांधला असून दोन पाण्याचे बोअर घेतले आहेत. त्याच बोअरमधून पाणी घेऊन गरजूंना पाणी पुरवतात. गावात पाण्याच्या अनेक योजना आल्या; पण या गावाची तहान काय भागत नाही. अखेर ही तहान मुबारकभाई शेख यांनाच भागवावी लागत आहे. अतिशय ध्येयवेड्या व कष्टाळू व्यक्तीस पाहिल्यानंतर इतरांनाही कामाची प्रेरणा निश्चित मिळेल. या पाण्याबरोबरच जमिनीखालचेही पाणी पाहतात. त्यामुळे दोन्ही अर्थाने मुबारकभाई हे पाणाडे आहेत. त्यांच्या वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा !

हॉटेल कामासाठी
कामगार पाहिजे
हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्वयंपाकी, वेटर व मॅनेजर पाहिजेत. गरजूंनी संपर्क करावा.
संपर्क : संदेश पर्यटन केंद्र
नगररोड, करमाळा. मो.9765505750

# सामाजिक कार्य आणि आजाराला प्रतिबंध

## भाग-१

सन १९७९ ते १९८८ हे दशक उपचार आणि रूग्णालय यासाठीच व्यापून राहिले. जेऊरसारख्या ग्रामीण भागात येण्याचा उद्देश हा अल्प दरात उपचार आणि आधुनिक वैद्यकिय सेवा ग्रामीण भागात मिळावी आणि काही प्रतिबंधात्मक सामाजिक कार्य करता यावे हाच होता.

अडचणीचं संधीत रूपांतर करता येतं हे सन १९८८ ला जेऊर येथे थांबणाऱ्या उद्यान एक्सप्रेसचा थांबा रद्द झाला आणि एका चळवळीत मी ओढल्या गेलो. जेऊर येथून पुणे येथे जाणारी एकही दिवसाची एक्सप्रेस राहिली नाही. खूप अडचणी ग्रामस्थांना येऊ लागल्या. म्हणून समविचारी ग्रामस्थांची सभा बोलावली आणि यात ग्रामसेवा संघ हा एनजीओ स्थापन झाला. त्याचे रजिस्ट्रेशन केले. मी संस्थापक सचिव झालो, तत्कालीन सरपंच निर्मळ हे अध्यक्ष आणि शंभर पेक्षा जास्त सभासद झाले. उद्योन एक्सप्रेस किंवा हैद्राबाद एक्सप्रेसचा थांबा जेऊरला मिळावा यासाठी रेलरोको आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्व तत्कालीन आमदार रावसाहेब पाटील यांनी केले. अत्यंत शांततापूर्वक या मोठ्या रेल रोकोला शासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन जेऊरला हैद्राबाद एक्सप्रेसचा थांबा मिळाला आणि ४० गावातील लोकांचा अल्प दरात पुणे येथे जाण्याचा प्रश्न मिटला.

भुखे पेट भजन नही होता गोपाला.. या धर्तीवर खाली जेब स्वास्थ नही होता गोपाला.., आणि सन १९७९ ते १९९२ या काळात अनेक शेतकऱ्यांची परिस्थिती फारच हालाखीची होती. त्यांच्या धान्याला किंवा पिकाला फारसा भाव नव्हता. त्यामुळे आरोग्याकडे फारच दुर्लक्ष. त्यांना स्थानिक सावकारीच्या पाशातून सोडविण्यासाठी एखाद्या वित्तीय संस्थेची गरज भासू लागली. माझा भाऊ चार्टर्ड अकाउंटंट सतीश याच्या मदतीने तत्कालीन मंत्री थोपटे यांनी खास बाब म्हणून पतसंस्थेची स्थापना करण्यासाठी अनुमती दिली. त्यानंतर १९९२ ला जेऊर येथे आनंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. यावेळी जेऊर येथील शिक्षण महर्षी कदम सर, राजकीय व्यक्तीमत्व गोविंदबापू पाटील, जेऊर येथील डॉक्टर्स, शिक्षक, व्यापारी आणि बहुतांशी शेतकरी माझ्यासोबत या संस्थेच्या स्थापनेत सहभागी झाले. मी संस्थापक/अध्यक्ष झालो आणि गेली ३३ वर्ष एक अपवाद वगळता सतत बिनविरोध निवडत गेलो. दहा बाय दहाच्या खोलीत सुरू झालेली ही संस्था आज स्वत:च्या सहा हजार चौरस फुटाच्या भव्य इमारतीत वाटचाल करत आहे. शेकडो युवकांना स्वयंरोजगार मिळवून दिला. अनेक युवक आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाले. अनेकांना छान घर बांधण्यासाठी मदत करता आली आणि एक मोठा विश्वास संपादन करता आला. तालुक्यातील अग्रगण्य संस्था म्हणून नामनिर्देश होत आला.आज या संस्थेच्या पाच कोटीच्या ठेवी असून सुरूवातीपासून सतत १५ टक्के लांभाश देणारी ही संस्था अनेकांना बचतीसाठी प्रोत्साहन देत राहिली.

आरोग्य आर्थिकदृष्ट्या संपन्न असेलतर शक्य आहे आणि आर्थिकदृष्ट्या विवंचना असेलतर अवघड होते. हे जाणल्यामुळे या संस्थेसाठी भरपूर वेळ मी देत राहिलो. यावेळी सर्व कर्मचारी, संचालक, प्रामाणिकपणे साथ देत राहिले हे अत्यंत आश्वासक म्हणूनच मी कृतज्ञ, मी कृतार्थ..! १९८० च्या काळात ग्रामीण भागात तज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करण्यासाठी अनेक आरोग्य शिबीरे घेतली. याविषयी पुढील भागात...!

...डॉ.सुभाष सुराणा, जेऊर


# १५ दिवसासाठी लग्न - प्लेजर मॅरेज

१५ दिवसासाठी लग्न.. हे वाचून आश्चर्य वाटले असेल. काही काहींना ही एक पर्वणी सुध्दा वाटली असेल, किंवा ही थापही वाटली असेल. अर्थात हे सर्व एकदम बरोबर आहे. इंडोनेशिया या देशात आर्थिक उत्पन्न कमी आहे. तेथे पर्यटनावर जास्त जोर दिला जातो. अर्थातच पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी येथे 'प्लेजर मॅरेज' अर्थात 'आनंद विवाह' नावाने एक जोरदार व्यवसाय सुरू आहे. येथील काही मुली पर्यटकासोबत दहा ते पंधरा दिवसासाठी विवाह करतात. अर्थात हा एक करारच असतो. पर्यटकाचा कालावधी संपला की या मुली पुन्हा नवीन पर्यटकांबरोबर दुसरे लग्न करतात. याला 'मुताह निकाह' असेही म्हणतात. अर्थातच हा विवाह हा निव्वळ पैसे कमवण्याचा मार्ग आहे. पर्यटकांना आनंद देवून त्याच्या बदल्यात



त्याच्याकडून पैसे घेतले जातात. हे विवाह एजंटा मार्फत जमविले जातात. एक एजंट प्रत्येक महिन्याला जवळपास २० ते २५ लग्न जमवू शकतो. सध्या इंडोनेशियामध्ये हा बिझनेस मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
fastrack
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी


आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558


19 फेब्रुवारी
अखंड हिंदुस्तानचे दैवत
छत्रपती शिवाजी महाराज
जयंती निमित्त
सर्व शिवभक्तांना हार्दिक शुभेच्छा !
प्रोप्रा : हवालदार बंधू
समर्थ
प्लास्टीक्स् & ॲग्रोटेक
निर्माते व विक्रेते...
● शेततळे कागद
● ताडपत्री
● मुरघास बॅग
● लहान आकाराच्या शेततळ्यासाठी ३००/४०० मायक्रॉन कागद मिळेल.
● गायींसाठी लागणारे रबर मॅट मिळेल.
● शेततळ्याचे लिकेज काढून मिळेल.
● अझोला बेड, गांडूळ खत बेड, कांदा गोणी
सिध्दीविनायक कंपनीचे दुध यंत्र मिळेल.
दूध उत्पादकांसाठी आनंदाची बातमी..
आता दूध मशीन मिळणार हप्त्यावर
● गाळा नं.४६, जामखेड रोड, मार्केट कमेटी, करमाळा. मो.8421216462
● गाळा नं.१३, नवीन भाजी मंडई, करमाळा. जि.सोलापूर मो.9881650926


19 फेब्रुवारी
यशवंत, किर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत, नीतीवंत जाणता राजा
शिवजन्मोत्सव
२०२५
निमित्त सर्व शिवभक्तांना भगव्या शिवमय शुभेच्छा...!
सोनाली
प्लाय फर्निचर
उत्तम दर्जाचे व टिकाऊ दरवाजे, स्लायडिंग विंडो
एस.एस.स्टील रेलींग मिळेल.
शिवाजी खाडे (9404299696), जगन्नाथ खाडे (9850930775)
पत्ता : गाळा नं.४७/४८, जामखेड रोड, करमाळा.


॥ आग्रहाचे निमंत्रण ॥
श्रीराम प्रतिष्ठान, करमाळा
आयोजित
सर्वधर्मिय सामुदायिक
विवाह सोहळा
रविवार दि.१६/२/२०२५ रोजी सायंकाळी ६ वा.२९ मि.
या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे. तरी या शुभमंगल प्रसंगी सहकुटूंब, सहपरिवार अगत्य येण्याचे करावे; ही नम्र विनंती !
निमंत्रक
मा.श्री.गणेश नागनाथ चिवटे
संस्थापक/अध्यक्ष- श्रीराम प्रतिष्ठान करमाळा.
जिल्हा सरचिटणीस - भारतीय जनता पार्टी
सदस्य - सोलापूर जिल्हा नियोजन समिती
सदस्य - सोलापूर जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती
• विवाहस्थळ •
रिलायन्स पेट्रोल पंप शेजारी कमलादेवी रोड, बायपास चौक करमाळा.